महाराष्ट्र शासन

# जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार.

पत्ता : जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, साक्री रोड, नंदुरबार-४२५४१२

Website -htpp://gmchnandurbar.com E -Mail:- deangmchnandurbar@gmail.com

जा.क्र. जबिमुंशावैमनं/किरकोळ भांडार विभाग/५१५४/२०२६ दिनांक-०३/०८/२०२६

दरपत्रक

प्रति,

१.

२.

३.

**विषय :- संस्थेचे वेब साईट मध्ये AI-Enabled Department CMS प्रणाली जोडणेकरिता दरपत्रक मोहोर बंद लिफाफा सादर करणे बाबत.**

**संदर्भ :-** १)उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णयक्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३ / उदयोग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६.

२) उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भांखस-२०२१/प्र.क्र.८/उद्योग- दिनांक ०७ मे, २०२१.

३) दिनांक-०३/०८/२०२६ रोजी मान्य कार्यालयीन टिपणी.

जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार या संस्थेचे वेबसाईटवर सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षातील विविध विभागांची शैक्षणिक, प्रशासकीय, संशोधन, दस्तऐवज, तपासणी व अनुपालन (Compliance) माहितीचे केंद्रीकृत, सुरक्षित व संरचित व्यवस्थापन इत्यादी बाबी संस्थेच्या Website वर अद्ययावत करणेकरिता स्वीय सहाय्यक, अधिष्ठाता कार्यालय यांच्या मागणीनुसार सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरिता या संस्थेचे वेब साईट मध्ये AI-Enabled Department CMS प्रणाली जोडणेकरिता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर कामकाज करण्यास इच्छुक असल्यास विर्निष्टानुसार आपला दरपत्रक मोहोरबंद लिफाफा विहीत मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्तीनुसार सादर करावा.

**अ.क्र.** **महत्वाच्या अटी व शर्ती**

१) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा दिनांक **१७/०८/२०२६** रोजी सायंकाळी **५.३०** वाजेपर्यंत या कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही /ग्राह्य धरले जाणार नाही.

२) सूचना फलक/संस्थेच्या संकेतस्थळावर जाहीर नोटीसप्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहोरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

३) दरपत्र मोहोरबंद लिफाफा **"अधिष्ठाता, जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार"** यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे लिफाफ्यावर डाव्या बाजूस **"दरपत्रक"**असे नमूद करावे. लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमूद असणे आवश्यक आहे.

४) दरपत्रक मोहोरबंद लिफाफे ही दिनांक **१८/०८/२०२६** रोजी सकाळी ठीक **११.००** वाजता मा.अधिष्ठाता यांच्या दालनात संस्थास्तरावर गठीत खरेदी समितीसमोर उघडण्यात येतील. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहावे.

५) दरपत्रकातील दर हे दिनांक **३१/०३/२०२७** पर्यंत ग्राह्य राहतील. करीता आपणास ग्राह्य दरानेच **सेवचा पुरवठा** करणे बंधनकारक राहील.

६) प्रस्तावित दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक व **सेवाचा** दर्जा/गुणवत्ता उत्कृष्ठ असेल, अशाच दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

७) सदर सेवा अनुषंगिक बाबी किंमत, जीएसटी कर व एकूण किंमत असे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

८) दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज (Document):- अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे.

१) दुकानाचा परवाना/व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र ,
२) पॅन कार्डची प्रत,
४) अनुभव प्रमाणपत्र
५)जी.एस.टी. प्रमाणपत्र,
६) आयकर विवरणपत्र

९) **पुरवठा (Delivery) :-** सदर सेवा पुरवठा आदेश दिल्यानंतर दरपत्रक तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार सेवेचा पुरवठा विहित मुदतीत करणे आपणावर बंधनकारक राहील. विहित मुदतीत समाधानकारक व विनिर्दिष्ठेनुसार साहित्य पुरवठा न केल्यास द्वितीय न्युनतम दरपत्रकधारकास पुरवठा आदेश देण्यात येतील.

१०) **देयकाची अदायगी :-** सेवा प्राप्त झाल्यानंतर संबधित पुरवठादारास उपलब्ध अनुदानानुसार देयकाची अदायगी करण्यात येईल. यशस्वी दरपत्रकधारकास आगाऊ रक्कम अदा करण्यात येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीमूळे देयक अदा करण्यास विलंबापोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त शुल्क/रक्कम हे कार्यालय अदा करणार नाही.

११) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे, अथवा प्राप्त झालेले दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे, तसेच कोणत्याही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता, जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार) यांनी राखून ठेवलेले आहेत.

(डॉ.संजय राठोड)
**अधिष्ठाता,**
**जननायक बिरसा मुंडा,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार**

प्रत:- १) कार्यालयाचे सूचना फलक.
२) Online Website, GMC, Nandurbar